ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १८ नोव्हेंबर, १९७० | अंक २१



## ठाकरसी कापडाने फॅशनची रंगत वाढते !





पुढचं पाऊल काय टाकावं हे कळेनासं होतं तेव्हा—प्रथम ठाकरसी कापड वापरा. मग कोणत्याहि कामासाठी आवश्यक सळसळतं चैतन्य, उल्हसित करणारा उत्साह आणि तरतरी वाटू लागेल! फॅशनच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्यासाठीं खुशाल पाऊल टाका नि ठाकरसीचं कापड घ्या. एव्हरफ्रेश (६७% 'टेरीन' ३३% कॉटन) साड्या, फ्रॉकचे कापड, शर्टिंग्ज आणि सूटिंग्ज, स्क्रीन प्रिंट्स, २×२ पॉप्लिन, रंगीत/प्रिंटेड् कॅम्ब्रिक्स, वॉयल्स, डॉबीज्, जेकार्डस्, आणि अनेक प्रकारचे कापड.

दि हिंदुस्थान स्पिनिंग ॲण्ड वीव्हिंग मिल्स लि., १६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१

# विविधोपयोगिता

किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय!



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या**
**किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस • सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर • फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँट्स् • व्हिस्कस लिक्विडस् • तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज • खत कारखाने



*किर्लोस्कर®*

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–२.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १८ नोव्हेंबर, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## निर्गतीचा माल देशी बाजारपेठ न व्यापो !

प्रत्येक देश म्हणजे त्या देशातील व्यापारी आणि कारखानदार दुसऱ्या देशाला म्हणजे त्यातील व्यापाऱ्यांना काही माल विकत असतो आणि काही माल त्यांच्याकडून खरेदी करीत असतो. ह्यालाच परराष्ट्रीय व्यापार म्हणतात. आयातीपेक्षा निर्गत जास्त झाली, म्हणजे देण्यापेक्षा येणे जास्त निर्माण होते; त्यामुळे परराष्ट्रीय व्यापाराचा आढावा अनुकूल आहे, असा निष्कर्ष निघतो. उलट, निर्गतीपेक्षा आयात जास्त असेल, तर त्यामुळे परराष्ट्रीय व्यापाराचा आढावा राष्ट्रास प्रतिकूल ठरतो. एका देशाचे दुसऱ्या देशाकडे येणे लागू होण्यास त्या देशाला माल पाठविणे हा एकच मार्ग नाही; इतरही अनेक मार्गांनी देशादेशांत देण्याघेण्याचे, ऋणकोधनकोचे व्यवहार उत्पन्न होतात. हे सर्व मार्ग एकत्र करूनच जो हिशेब निघतो, तोच खरा देवघेवीचा आढावा होय. मालाची प्रत्यक्ष आयात-निर्गत न करता ज्या मार्गे देणी-घेणी निर्माण होतात, ते मार्ग मुख्यत: असे :— ( १ ) मालाच्या वाहतुकीचा व विमा उतरण्याचा धंदा ( २ ) परराष्ट्रांत गुंतलेले भांडवल व त्यावरील व्याज ( ३ ) परदेशांत राहावयास गेलेल्यांना पाठविलेली रक्कम व त्यांच्याकडून येणारी रक्कम ( ४ ) एक्सचेंज बँकांना होणारी मिळकत ( ५ ) कनिष्ठ देशांकडून मिळणाऱ्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, खंडण्या. एका देशाने दुसऱ्या देशास पाठविलेला माल, पैसे, कामगिऱ्या व त्या देशाने द्यावयाचे व्याज व इतर देणी ह्या सर्वांची बेरीज लक्षात घ्यावी लागते.

भारताची आयात निर्गतीपेक्षा मोठी आहे म्हणजे मालाच्या व्यापारात आपण देणेकरीच आहोत. इतर पाचही बाबतीत आपण इतर देशांकडे फारसे येणे निर्माण करू शकत नाही; त्याही बाबतीत आपण सतत देणेकरीच आहोत. ह्या दृष्टीने विचार करता, आपण मालाची निर्गत वाढवितो तशी आणखी अप्रत्यक्ष कशाची निर्गत करता आली, तर हवीच आहे. ह्या निर्गतीसाठी कमीत कमी खर्च पडला, तर त्यात जास्तीत जास्त वाढावा राहू शकेल हे उघड आहे.

" हरेकृष्ण हरेकृष्ण " मंत्राचा अशा निर्गतीत समावेश होऊ पाहात आहे. ह्या मंत्राला उत्पादन-खर्च काहीच येत नसल्यामुळे सर्वच्या सर्व मिळकत नफा म्हणूनच उरणार आहे. भारतीय स्वामी अशा मंत्राचे उत्कृष्ट प्रचारक बनत आहेत. मालाचे कार्यक्षमतेने उत्पादन करून ते जागतिक बाजारपेठेत किफायतशीर विकणे आपल्या कारखानदारांना सोपे नाही; परंतु त्यांनी भारतीय स्वामींना हाताशी धरून त्यांना अमेरिकेकडे पाठविले आणि त्यांच्यावर थोडासा खर्च केला, तर हा एक्सपोर्ट प्रमोशनाचा खर्च खूपच फलदायी ठरण्याचा संभव आहे. आपले व्यापारी आणि उद्योगपती आर्थिक आणि आध्यात्मिक वृत्तीचे असतातच; तेव्हा त्यांनी " हरेकृष्ण, हरेकृष्ण " मंत्राच्या निर्गतीसाठी हातभार लावला, तर ते देशहिताचेच ठरेल. मात्र, मंत्र फक्त निर्गतीसाठीच उपयोगात आणला पाहिजे; जेथे त्याची गरज आहे तेथेच त्याचा प्रसार व्हायला हवा. भारतात जास्त गरज आहे उत्पादनवाढीची, कार्यक्षमतेची. तेव्हा निर्गतीचा माल देशी बाजारपेठ न व्यापो !

---

## महाराष्ट्रातील उसाचे दर एकरी उत्पादन घटले; साखरेचा उताराही घटला : सर्वांगीण चौकशीची आवश्यकता

महाराष्ट्राची जमीन आणि हवामान उसाच्या लागवडीस आणि साखरधंद्यास अनुकूल असूनही गेली काही वर्षे दर-एकरी उसाचे उत्पादन आणि साखरेच्या उताऱ्याचे प्रमाण घटत चालले आहे, हे खालील तक्ता दर्शवितो.

| वर्ष | दरएकरी उत्पादन मे. टन | साखरेचा उतारा % |
|---|---|---|
| १९६३–६४ | ३४·० | ११·९७ |
| १९६४–६५ | २७·२ | ११·६५ |
| १९६५–६६ | २६·२ | ११·४२ |
| १९६६–६७ | २५·१ | ११·२९ |
| १९६७–६८ | २५·६ | ११·२७ |
| १९६८–६९ | २६·७ | ११·२८ |
| १९६९–७० | — | १०·७४ |

ह्या विषयी बोलताना डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. एस. एल. लिमये म्हणाले की, लावण्यात येणाऱ्या उसाच्या जातींची योग्यायोग्यता, दिलेले एकूण पाणी आणि पाळ्यांतील दिवसांचे अंतर, खतांचा प्रकार, ते देण्याची वेळ, लागवडीच्या पद्धती आणि पीकसंरक्षण उपाय ह्या सर्वांची काळजीपूर्वक छाननी करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रात सध्या लोकप्रिय झालेली उसाची CO-७४० ही जात यशस्वी ठरलेली नाही, असे मला काही तज्ज्ञांनी सांगितले आहे. ह्याचा अर्थ अधिक सोइस्कर जात शोधून काढायला हवी. स्टेट शुगर केन कमिटीने चौकशीस प्रारंभ केला आहे. भारत सरकारनेही महाराष्ट्रातील उतारा घटण्याची कारणे शोधून उसातील साखरेचा अंश वाढविण्यासाठी उपाय सुचविण्याकरीता एक तज्ज्ञांचे मंडळ नेमले आहे.

---

## " हरेकृष्ण, हरेकृष्ण " भजनाचा प्रभाव

सिंधिया स्टीम कंपनीच्या " जलदूत " ह्या मालवाहू आगबोटीतून अमेरिकेस जाण्यास १३ ऑगस्ट, १९६५ रोजी कंपनीच्या डायरेक्टर-इन-चार्जनी एका ७० वर्षे वयाच्या वृद्धाला मोफत जागा दिली. डायरेक्टर-इन-चार्ज श्रीमती सुमति मुरारजी ह्यांनी आगबोटीचे कप्तान पंड्या ह्यांना ह्या वृद्धाची सर्वतोपरी काळजी घेण्यास स्वतः सांगितले. हा वृद्ध मनुष्य त्याच्या गुरूच्या आदेशाप्रमाणे अमेरिकेला जात आहे, ह्याबद्दल श्रीमती मुरारजी ह्यांची खात्री झालेली होती.

कॅप्टन पंड्या ह्यांनी हा वृद्ध अमेरिकेला सुखरूप पोहोचल्याचे श्रीमती मुरारजींना कळविले. " पण त्याच्या तोळामासा प्रकृतीवरून तो पुनः परत येऊ शकेल असे मला वाटत नाही. " असेही त्यांनी सांगितले.

पण, सोमवार, दि. ९ नोव्हेंबर १९७० रोजी मुंबईमधील सिंधिया हाऊसमध्ये त्याच्या स्वागत समारंभाचे वेळी श्रीमती सुमति मुरारजी ह्या स्वतः उपस्थित होत्या.

हरेकृष्ण चळवळीचे जनक, भक्तिवेदान्त स्वामी, हे आपल्या ४० शिष्यांसह आता भारतात परत आले आहेत. सिंधिया हाऊस मध्ये " हरेकृष्ण, हरेकृष्ण " चा घोष वाढत चालला, तशी कित्येक फॅशनेबल स्त्री-पुरुष त्या भजनात सामील झाले. त्यांना मोठ्यांदा " हरेकृष्ण, हरेकृष्ण " म्हणायला लावण्यामध्ये स्वामीजींच्या, साडी परिधान केलेल्या अमेरिकन शिष्येने " बोलो, बोलो " म्हणून पुढाकार घेतला होता. श्रीमती मुरारजींनीही टाळीने ताल धरला होता. जमलेल्या स्त्री-पुरुषांवर ह्या सर्वांचा परिणाम झाला. डॉ. बाली आणि त्यांची अभिनेत्री पत्नी वैजयंतीमाला हे संस्थेचे आजीव सभासद झाले. " ही संस्था मुंबईत केंद्र उभारणार आहे. त्याच्या मदतीसाठी माझा नृत्याचा कार्यक्रम करण्यास मी आनंदाने तयार होईन " असे वैजयंतीमालाने जाहीर केले. ह्या संस्थेच्या प्रचार-वाङ्मयासाठी बीटल जॉर्ज हॅरिसने २ लक्ष रुपये दिले आहेत. " हरेकृष्ण " तबकड्यांचा अमेरिकेत प्रचंड खप होत आहे; त्यावरील रॉयल्टीचे उत्पन्नही चांगले मिळते.

" पहिल्या वर्षी मी अमेरिकेत काही करू शकलो नाही. टॉमकिन्सन स्क्वेअरमध्ये मी " हरेकृष्ण " भजन म्हणत बसावयाचा. आता सुमारे १,००० लोकांनी माझे प्रत्यक्ष शिष्यत्व पत्करले आहे. भक्तगणांची संख्या तर खूपच मोठी आहे. व्हर्जिनियात आम्हाला ४०० एकर जागा मिळाली आहे. लॉस एंजल्सप्रमाणे आणखी कित्येक ठिकाणी वृंदावने स्थापन करण्यात आली आहेत " असे स्वामीजींनी सांगितले. सिंधिया हाऊसमध्ये त्यांनी कित्येक लोकांना इतके प्रभावित केले की त्यांना व त्यांच्या शिष्यांना भजनाला येण्यासाठी कितीतरी निमंत्रणे मिळाली आहेत.

---

## विविध माहिती

**परदेश प्रवासावर कर**-- इराकच्या सरकारने परदेश प्रवासावर कर बसविला आहे. त्या देशाबाहेर जाणाऱ्या १८ वर्षांवरील प्रत्येकाला ४५० रु. कर द्यावा लागेल.

**इन्कमटॅक्स द्यावा लागणार**—राष्ट्रीयीकृत बँकांना दिलेल्या रोख्यांवरील व्याज इन्कमटॅक्सला पात्र असेल, असे सरकारतर्फे सांगण्यात आले.

**११ वर्षांत ५ चेअरमेन**— हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनला ११ वर्षांत ५ चेअरमेनचा लाभ झाला ! एच. ई. सी. सारख्या महत्त्वाच्या आणि गुंतागुंतीच्या कारखान्याच्या प्रमुखांत वारंवार बदल होणे इष्ट नाही, पण झालेले बदल अटळ होते, असे पोलाद उपमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले. डॉ. ए. नागेशराव, श्री. टी. आर. गुप्ता, श्री. के. डी. मालवीय, श्री. सी. चलपतिराव आणि श्री. एस. एस. जगोता ( विद्यमान चेअरमन ) हे ते पाच चेअरमन होत.

**संस्थानिकांच्या परदेशातील शिलका**—रिझर्व्ह बँकेने पुरविलेल्या माहितीप्रमाणे, २७ भूतपूर्व संस्थानिकांचे परदेशी बँकांत ३१-१२-१९६८ रोजी ६१ लक्ष रु. होते. त्यांपैकी नऊ जणांची १.१३ कोटी रु.ची परदेशी रोख्यांत गुंतवणूक होती.

**हरिदास मुंध्रांना कर्जे**—हरिदास मुंध्रा, त्यांचे नातेवाईक आणि त्यांचे कारखाने ह्यांना राष्ट्रीयीकृत १४ बँकांनी दिलेल्या कर्जांची रक्कम ३० जून, १९७० रोजी १८९.६० लक्ष रु. होती.

**किंमतींचा निर्देशांक वाढला**—घाऊक किंमतींचा इंडेक्स नंबर एका वर्षात ६.८% ने वाढला आहे. अन्नपदार्थांच्या किंमती ६% ने वाढल्या, औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमती ११% ने वाढल्या आणि तयार मालाच्या किंमती ७.८% ने वाढल्या. अन्नपदार्थांच्या किंमतीमधील सर्वांत मोठी वाढ तेल (१६.३%), दूध ( १४.२% ), फळे व भाज्या ( १३.८% ), आणि कॉफी ( ४०.७% ), ह्यांत झाली. धान्यांपैकी तांदुळाची किंमत ३% ने वाढली, तर गव्हाची किंमत थोडी खाली आली. बाजरीची किंमत २७.७% ने उतरली. तयार मालाच्या किंमतीमधील वाढीस कच्च्या मालाच्या, किंमतीमधील वाढ आणि मजुरीच्या दरात वाढ ही प्रमुख कारणे आहेत. तथापि, चलनवाढीमुळेही महागाईत भर पडली आहे, हे अर्थमंत्र्यांनी कबूल केले.

**बँकांतील लाचलुचपत** — " राष्ट्रीयीकृत बँकांच्या कचेऱ्यांतून लाचलुचपत वाढली असल्याची सरकारला माहिती मिळाली आहे " असे अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी सांगितले. " कर्ज मिळण्यासाठी ' कमिशन ' द्यावे लागते " ह्या तक्रारीस त्यांनी वरीलप्रमाणे उत्तर दिले. कस्टोडिअन्सना त्यांनी जागरूक राहाण्यास सांगितले आहे.

# सहकार-महर्षी आमदार श्री. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील (अकलूज) यांचा परिचय

## शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध क्षेत्रांत दूरदृष्टीने विधायक कार्य



सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्याच्या माळरानात नीरा नदीच्या काठी वसलेल्या अकलूज या खेड्यात दिनांक १४-१-१९१८ रोजी एका खानदानी शेतकरी कुटुंबात आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांचा जन्म झाला. घरी शेतीवाडी मुबलक, पण लहानपणापासून शेतकऱ्यांच्यासाठी सेवाकार्याची तळमळ त्यांच्या रोमारोमांत भिनली असल्याकारणाने त्यांनी आपले जीवन लोकोपयोगी समाजकार्यास वाहिले.

१९४२ साली अकलूज विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे व माळशिरस तालुका सुपरवायझिंग युनियनचे अध्यक्ष म्हणून निवड होऊन त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा श्रीगणेशा झाला.

शेतकऱ्यांच्या अडीअडचणी निवारण करण्यासाठी आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील हे अहोरात्र प्रयत्न करीत असल्यामुळे १९५१, १९५७, १९६२ व १९६७ या साली झालेल्या चारही विधानसभेच्या निवडणुकींमध्ये प्रचंड बहुमताने शेतकऱ्यांनी त्यांना निवडून दिले. शेतकऱ्यांमध्ये असलेली त्यांची ही लोकप्रियता, शेतकऱ्यांच्या उन्नतीविषयीची तळमळ व त्यांचे विधायक कार्य यांचेच वरील विजय म्हणजे द्योतक मानले पाहिजे.

शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीबाबत होणारी हेळसांड ही त्यांच्या लक्षात येऊन विशेषतः शेतकऱ्यांचे कापसाच्या विक्रीचे काटे जिनींग फॅक्टरीत न घेता ज्या दुकानांतून कापसाची विक्री होते त्या दुकानांतच काटे घेतले पाहिजेत, याबाबत अकलूज अॅग्रिकल्चरल मार्केटिंग कमिटीचा, महाराष्ट्रात ही प्रथा पाडण्यात अग्रक्रम असून त्याचे श्रेय सर्वश्री अकलूज अॅग्रिकल्चरल मार्केट कमिटीचे चेअरमन आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनाच आहे. तसेच सहकारी पद्धतीवर शेतीमाल खरेदी-विक्री संघाची स्थापना करून त्या संघामार्फत शेतीमाल उत्पादनासाठी लागणाऱ्या उत्तम मिश्रखतांचा शेतकऱ्यांना पुरवठा करण्यासाठी कारखाना काढला असून या मिश्रखतास आज महाराष्ट्रातून फारच मोठी मागणी आहे.

"या कारखान्याची उभारणी करण्यासाठी जेवढे दगड लागलेले आहेत, तितक्या खस्ता व अडचणी यांतून आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनी मार्ग काढला, तेव्हा कोठे हा शेतकऱ्यांच्या भाग्योदयाचा दरवाजा उघडला आहे." वरील उद्गार अकलूज येथील यशवंत साखर कारखान्याच्या उद्घाटन-प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व भारताचे सध्याचे अर्थमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी काढले. सोलापूर जिल्ह्यात सहकारी साखर कारखान्यांचा नवा आदर्श, नवी उमेद, नवी आशा या सहकारी साखर कारखान्याचे कुशल शिल्पकार आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनी घातला. सहकारी चळवळीचे लोण त्यांनी शेतकऱ्यांच्या झोपडीशी आणले व गरीब शेतकऱ्यांचा अडीच कोटी रुपयांचा कारखाना उभा केला, जिद्दीने बांधणी केली व सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी आज आमदार श्री शंकररावजी मोहिते-पाटील यांना डोळ्यांत आनंदाश्रू आणून धन्यवाद व आशीर्वाद देत आहेत.

यशवंत सहकारी साखर कारखान्यापर्यंत ऊस-वाहतुकीसाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून या साखरकारखान्यातील सभासदांच्या मालकीचे मालट्रक खरेदीची योजना आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनी हाती घेऊन आज यशवंत सहकारी साखरकारखान्याच्या सभासदांच्या स्वतःच्या मालकीच्या ट्रकसमधून ऊस व साखर वाहतूक होत आहे.

यशवंत सहकारी साखरकारखाना व अकलूजच्या परिसरात इतर सहकारी संस्थांच्या नोकर वर्गाच्या व मध्यम वर्गाच्या आर्थिक हित-संवर्धनासाठी 'राजहंस कुक्कुटपालन सहकारी संस्थे'ची उभारणी करून ५ एकरांच्या विस्तीर्ण आवारात ५ कोटी रुपयांच्या कुक्कुट-पालन योजनेचा संसार चालू पंचवार्षिक योजनेत पुरा करणार आहेत.

देशाने मिळविलेल्या स्वराज्याचा पाया मजबूत होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक असते ही गोष्ट लक्षात घेऊन श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनी अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. त्या शिक्षण संस्थेस त्यांनी ११ एकर जमीन दान दिली. अकलूज शिक्षण प्रसारक मंडळातर्फे सदाशिव माने विद्यालयाची व विजय विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली. श्री. शंकररावजी यांनी सुरू केलेल्या या विद्यालयात आज सुमारे १,००० विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेत असून वसतिगृहात सुमारे १५० मुले राहात आहेत. ग्रामीण भागांतून औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून अकलूज येथे टेक्निकल स्कूल आमदार श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांनी नुकतेच सुरू केले आहे.

ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहराकडे धाव घ्यावी लागते. व आर्थिक अडचणीमुळे सर्वसाधारण ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणास मुकावे लागते, ही अडचण लक्षात घेऊन अल्प खर्चात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांच्या भगीरथ प्रयत्नामुळे अकलूज येथे महाविद्यालय उघडण्यात आले आहे. या महाविद्यालयामुळे माळशिरस तालुका व आसपासच्या खेड्यांतील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची अल्प खर्चात सोय झाली आहे.

सोलापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक स्थापन होऊन दहा वर्षे झाली. सुरवातीच्या तीन वर्षांच्या काळात समाधानकारक रीतीने ५० लाख रुपयांचे कर्जवाटप झाले. शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनात क्रांतीकारक बदल व्हावयाचा असेल तर त्यांच्या बागाईत शेतीचे क्षेत्र जास्तीत जास्त वाढविले पाहिजे व या जिद्दीने त्यांनी १९६१-६२ साली अध्यक्षपदाची धुरा खांद्यावर घेतली. त्या वेळेपासून एकमताने ते बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. तेव्हापासून सर्व नियमांची बंधने पाळून भू-विकास बँकेमार्फत शेतकऱ्यांना कमीत-कमी त्रासात व वेळात दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे कसे सुकर होईल याकडे आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील लक्ष पुरवू लागले. त्यांनी सात वर्षांच्या काळात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या बँकेमार्फत १५,१५६ नवीन विहिरी, ४,२६६ जुन्या विहिरी व ६,७६७ इंजिन्स, पंपिंगसेटस् व इले. मोटर्स १,११२ व उपसा जलसिंचन योजना २९, ट्रॅक्टर्स १०, पाईप लाईन्स ९६, जमीन सुधारणा व इतर १,१५२ इत्यादींसाठी एकूण ८ कोटी ९४ लाख रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करून वाटप केले आहे व ही बँक अत्यंत प्रगतिशील व सहकारी चळवळीत आघाडीवर असल्याचे समजले जाते. या बँकेचे खेळते भांडवल सध्या ८ कोटी, ८० लाख रुपये आहे.

पावसाळ्यात जमीनसुधारणा करण्याचे काम नीटसे होत नसल्याने भू-विकास बँकेकडून जुलै ते सप्टेंबर या महिन्यांत दीर्घ मुदतीचे कर्जवाटप होत नसे. पण सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण फार कमी असल्याने व पावसाची सुरवात साधारणपणे ऑगस्टपासून सुरू होत असल्याने भू-विकास बँकेचे कर्जवाटप पावसाळ्यात बंद करू नये, याबाबत त्यांनी प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नास यश येऊन सर्व महाराष्ट्रात पावसाळ्यातही जुन्या विहिरी, इंजिन्स व पंपिंग सेटस्, जमीनसुधारणा वगैरेंकरिता कर्जवाटपास सुरवात झाली व नवीन विहिरींसाठी कर्जवाटपाबाबत डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रारनी शिफारस केल्यास, त्यासाठीही कर्जवाटप करता येते. तसेच भू-विकास बँकेकडून दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करताना यापूर्वी सोसायटीकडून घेतलेल्या कर्जाच्या दुप्पट रक्कम दीर्घ मुदतीचे कर्जमंजूरीस पात्र असलेल्या रकमेतून वजावट होत असे. सोसायटीचे कर्ज अल्प मुदतीचे असल्याने त्याची वर्षाच्या आत परतफेड होत असे त्यामुळे हे सोसायटीचे कर्ज वजावट केल्याने शेतकऱ्यांना शेती सुधारण्याकरिता अकारण कमी कर्ज उपलब्ध होत असे. आमदार श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांनी सोसायटीच्या कर्जाची रक्कम दीर्घ मुदतीच्या कर्जास पात्र असलेल्या रकमेतून वजावट करू नये याबाबत मा. रजिस्ट्रार, को-ऑप. सोसायटीज्, महाराष्ट्र यांच्याशी विचारविनिमय केला व आमदार श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नशील वृत्तीमुळे त्यात यश येऊन महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला.

सोलापूर भू-विकास बँकेने नुकतेच प्रयोगादाखल भू-संवर्धन योजना हाती घेतली असून भू-विकास बँकेने या योजनेखाली अल्प काळातच सुमारे ५२ लाख, ७८ हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे.

दीर्घ मुदतीची कर्जमागणीची प्रकरणे लवकर तयार होऊन शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज लवकरात लवकर मिळावे म्हणून महाराष्ट्रात प्रथमतः सामुदायिकरीत्या कर्जमागणी अर्ज तयार करून स्वीकारण्याची मोहीम सुरू केली. तसेच शेतकऱ्यांना सुलभ रीतीने कर्ज मिळण्यासाठी कर्जमागणी अर्ज गोळा करणे व चौकशी करण्याचे काम बँकेने दिनांक १-१-१९६९ पासून आपल्या हाती घेतले आहे. त्यामुळे अगदी अल्प वेळात कर्जमागणीचे अर्ज तयार करण्यात येऊन शेतकऱ्यांना कर्ज तावडतोब देण्याची व्यवस्था केली.

नदीकाठी जमीनी असणाऱ्या शेतकऱ्यांना उपसा जलसिंचन योजनेसाठी कर्ज देण्याचे धोरण भू-विकास बँकेने स्वीकारले असून, महाराष्ट्र सरकारने शेतकी पतपुरवठा महामंडळ यांच्या आर्थिक साहाय्याने सहकारी पाणीपुरवठा मंडळ यांना कर्जवाटप करण्याची योजना आखली आहे. सध्या बँकेकडे सुमारे ६५ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी आल्या आहेत व सामुदायिकपणे येणाऱ्या शेतकऱ्यांना पाणीपुरवठा योजनेसाठी कर्जपुरवठा बँक करीत आहे.

"विशाल विहीर योजने"ची कल्पना आमदार श्री. शंकररावजी मोहिते-पाटील यांनीच सर्व प्रथम सादर केली असून या योजनेची महाराष्ट्रात सर्वत्र प्रशंसा केली जात आहे. जे अल्प-धारक शेतकरी आहेत व ज्यांना जमीन बागाईत करण्यासाठी बँकेच्या कर्जाचा उपयोग करून घेण्यासाठी पुरेसे तारण नाही, अशा अल्पधारक शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन त्यांच्या जमिनी तारण द्यावयाच्या व सामायिक मोठी विहीर खोदावयाची. या विहिरीवर सर्व सभासदांनी त्यांच्या जमिनी बागाईत करावयाच्या, या विशाल विहीर योजनेमुळे श्रमाची व पैशाची खूप मोठ्या प्रमाणात बचत होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी भू-विकास बँकेकडून घेतलेल्या भांडवली विकास कर्जाचा जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करून घ्यावा व त्याच्या साहाय्याने जास्तीत जास्त आधुनिक पद्धतीने शेतीसुधारणा करून जास्तीत जास्त प्रमाणात अन्नधान्य उत्पादन करून स्वतःच्या व पर्यायाने राष्ट्राच्या उत्पादनात वाढ करावी या विशाल ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून

हजारो मैलांचा प्रवास स्वखर्चाने केला. या बँकेच्या व्यतिरिक्त यशवंत सहकारी साखर कारखाना, अकलूज; श्री. शंकर सहकारी साखर कारखाना, सदाशिवनगर; सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., सोलापूर; माळशिरस तालुका सहकारी सोसायट्यांचा खरेदी-विक्री संघ; सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज वगैरे अनेक मोठ्या सहकारी व शिक्षणसंस्थांत ते पदाधिकारी असून त्यांचे नेतृत्वाखाली अकलूज येथे सहकारी सूत गिरणी व तेल गिरणी काढण्याचे जारीने प्रयत्न चालू आहेत.

केव्हाही पाहा, ते लोककार्यात गढलेले दिसून येतील. त्यांच्या कामाचा उरक फारच दांडगा असून प्रसंगोपात निर्माण होणाऱ्या अडचणींतून ते सहज सुलभतेने मार्ग काढतात व कधीही आपल्या धीरगंभीर प्रवृत्तीपासून विचलित होत नाहीत. सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय व सहकारी कार्यक्षेत्रात अग्रगण्य व सोज्वल नेते म्हणून त्यांचा लौकीक आहे. सामाजिक, शैक्षणिक व सहकारी चळवळीत ते करीत असलेल्या भरीव कार्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील परिसर सौंदर्यशाली व वैभवसंपन्न बनू पाहात आहे.

---

### भारताने वापरलेली परराष्ट्रीय मदत
### एप्रिल, १९५१ ते मे, १९७०

| | कोटी रु. | एकूण मदतीशी प्रमाण % |
|---|---|---|
| अमेरिका | ६,५९० | ५६·४ |
| जागतिक बँक व आय. डी. ए. | १,४५० | १२·४ |
| प. जर्मनी | ८८४ | ७·६ |
| ब्रिटन | ६९३ | ५·९ |
| रशिया | ६५२ | ५·६ |
| कॅनडा | ५१७ | ४·४ |
| जपान | ३२३ | २·८ |
| इटली | १३२ | १·१ |
| फ्रान्स | ९४ | ०·८ |
| झेकोस्लोव्हाकिया | ६५ | ०·६ |
| ऑस्ट्रेलिया | ६१ | ०·५ |
| नेदरलंड्स | ५२ | ०·४ |
| युगोस्लाव्हिया | २९ | ०·२ |
| पोलंड | २८ | ०·२ |
| स्वित्झरलंड | २५ | ०·२ |
| बेल्जम | २२ | ०·२ |
| ऑस्ट्रिया | २१ | ०·२ |
| स्वीडन | १४ | ०·१ |
| डेन्मार्क | १० | ०·१ |
| नॉर्वे | १० | ०·१ |
| न्यूझीलंड | ५ | *** |
| हंगेरी | — | — |
| बल्गेरिया | — | — |
| एकूण | ११,६७६ | १००·० |

## विविध माहिती

**पोस्टाच्या तिकिटांचे राजकारण**—मिसेस बंदरनायके १९६० ते १९६५ सिलोनमध्ये अधिकारावर होत्या, तेव्हा त्यांनी आपल्या पतीच्या चित्राचे १० सेंटचे पोस्टाचे तिकीट वापरात आणले. १९६५ साली त्यांचा पराभव झाल्यावर ह्या तिकिटाची जागा सिलोनचे पहिले पंतप्रधान डी. एस. सेनानायके तिकिटाने घेतली. हे तिकीट मिसेस् बंदरनायके चवथ्या पंतप्रधान होण्यापूर्वीही वापरात होते. मे, १९७० मध्ये मिसेस् बंदरनायके पुनः पंतप्रधान झाल्या, तेव्हा त्यांनी पुनः बंदरनायके तिकीट सुरू केले आणि सेनानायके तिकिटांचा विक्री थांबवली. ३० लक्ष रु. किमतीची सेनानायके तिकिटे आता सरकारी तिजोरीत पडून आहेत.

**जागतिक बाजारपेठेत ब्रिटनची घसरगुंडी**—गेल्या पाच वर्षांत ग्रेट ब्रिटनचा जागतिक निर्यातीमधील वाटा ८·४% वरून ७·२% वर उतरला. पश्चिम जर्मनी आणि जपान ह्यांची वाढती स्पर्धा, विक्रीच्या आधुनिक तंत्रांचा परदेशी स्पर्धकांनी केलेला वापर, ब्रिटनमधील संपामुळे मालाचा पुरवठा करण्यात होणारी दिरंगाई, ही त्याची कारणे आहेत.

**सिलोनमधील विदेशी बँका**—सिलोनमधील विदेशी बँकांचे १९७१ अखेरच्या आत राष्ट्रीयीकरण करण्यात येणार आहे.

**ऑस्ट्रेलियन मेंढ्यांची विमानाने आयात**—कॉरिडेल जातीच्या ३०० ऑस्ट्रेलियन मेंढ्या विमानाने हरयाना राज्यातील हिस्सार येथे दाखल झाल्या. २६ नोव्हेंबर अखेर आणखी ७३० मेंढ्या यावयाच्या आहेत. पाच वर्षांत मिळून ५,१०० मेंढ्यांची आयात पुरी होईल. मेंढ्यांवर देखरेख करण्याचे शिक्षण दिलेले धनगरी केल्पी कुत्रेही लवकरच यावयाचे आहेत.

**"भारताला मिळणारी ८२% मदत गडप होते"**—"भारताला मिळणाऱ्या परदेशी मदतीपैकी ८२% मदत गरीबांपर्यंत पोहोचतच नाही, वाटेतच खलास होते." असे भारतात भरलेल्या आंतरराष्ट्रीय पार्लमेंटरी परिषदेला आलेल्या न्यूझीलंडच्या प्रतिनिधी मंडळाचे नेते मि गॉर्डन ग्रीव्ह ह्यांनी म्हटले आहे.

**पुरामुळे १,१०० जणांचा मृत्यू**—चालू वर्षी भारतातील पुरांमुळे एकूण १,१०० जणांवर मृत्यू ओढवला. त्यांपैकी ४३२ गुजरातमध्ये आणि ३४४ उत्तर प्रदेशात मृत्यू पावले.

**प्रत्येक २५ हजार वस्तीच्या गावी उद्योग-विनिमय केंद्र**—देशातील २५ हजार लोकवस्तीच्या प्रत्येक गावी उद्योग-विनिमय केंद्र काढण्याचा भारत सरकारचा विचार आहे. त्यामुळे रोजगार मिळविणे खेडगावातील लोकांना सुलभ होईल. १९६६ मध्ये काम हवे असलेल्या २६ लक्ष लोकांची नावे उद्योगविनिमय केंद्रात नोंदलेली होती; ती संख्या आता ३६ लक्षांवर गेली आहे.

# कै. सौ. प्रभावती मधुकर वडके



## श्रद्धांजली....

सौभाग्याचे लेणें घेऊनी, प्रभुदारी तूं धांवली !
कोटी कोटी प्रणाम आमुचे घेई गे माऊली
प्रभाव होता, तशीच शक्ति, वडके संसारी
भावभक्तीचा सदैव होता, घरी आणि दारी
वदला कोणी, उणं कशाचे, धांव तिथें पहिली
"तीर्थ माझी प्रभू पूजा ही" हे शिकवी माऊली
मनांत नव्हता राग, द्वेष वा लोभ कधी कसला
धुसफूस नव्हती कधीं संसारी, कधीं न कटु बोला
कर्तव्याचा नंदादीप तो, ठेवुनी तेवत गेली माऊली देवाघरी
रक्षण करूं गे त्याच दीपाचे, ज्योति उजळूं संसारी
वसने लेवूनी सौभाग्याची वाण सतीचे करी
डमरू निनादे शब्द सांगती, शिवपार्वती प्रीति
केली प्रीति अशीच तूहि, ती सर्वांवरती

त्या प्रीतीची, त्या श्रद्धेची भावपूर्ण आदरांजली चिरशांति दे, देई ईश्वरा, स्वकार श्रद्धांजली

| | | |
|---|---|---|
| रमेश मधुकर वडके | सौ. शामला दत्तात्रेय करडे | सौ. रेखा रणशिंगे |
| प्रकाश मधुकर वडके | दत्तात्रेय शंकर करडे | रमेश मदन रणशिंगे |
| स्वीस ट्रेडिंग कॉर्पोरेशन, मुंबई ४. | वर्षा इंडस्ट्रीज पुणें ४. | मुंबई ७. |

प्रथम मासिक श्राद्ध दिन दि. ११ नोव्हेंबर, १९७०

## डिझेल इंजिनांचे वाईट दिवस संपले

देशभर चांगला पाऊस झाला आणि शेतीच्या उत्पादनाच्या किंमती वाढत आहेत, त्यामुळे डिझेल इंजिन-पंप सेट्सनाही मागणी चांगली येत आहे. एका मोठ्या कारखान्यात जून, १९७० अखेर ३ ते १० अश्वशक्तीची २५,००० डिझेल इंजिने पडून होती; आता ती सर्व विकली गेली आहेत. दुसऱ्या एका कारखान्याचे गुदामातील ५ ते २० अश्वशक्तीची ४,००० ऑईल इंजिने गिऱ्हाइकांच्या शेतवाडीवर गेली आहेत. उसाच्या किंमतीमधील घटीमुळे ( डिझेल पंपांचे उसकरी हे प्रमुख गिऱ्हाईक आहे ) गेल्या वर्षी डिझेल पंपांस मागणी कमी झाली होती. काही प्रदेशात दुष्काळ पडला होता आणि ग्रामीण भागातील वाढता वीजपुरवठा हेही मंदीचे एक कारण होते. जे कारखाने शेती-व्यतिरिक्त इतर धंद्यांस उपयुक्त अशी इंजिने बनवू लागले आहेत, त्यांना भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

## १८३ वृत्तपत्रांचा मालक

वेगवेगळ्या देशातील १८३ वृत्तपत्रे ज्यांच्या मालकीची आहेत, असे लॉर्ड रॉय टॉमसन ह्यांना भारतातही एकादे वृत्तपत्र मालकीचे करण्याची इच्छा आहे. परंतु भारत सरकारच्या धोरणाच्या ते विरुद्ध होईल म्हणून त्यांनी त्यासाठी प्रयत्न केलेला नाही, असे त्यांनीच सांगितले. जगातील ६३५ वेगवेगळ्या धंद्यांचे ते प्रमुख आहेत. "दि टाइम्स" हे वृत्तपत्र वगळले, तर हे बाकीचे सर्व धंदे किफायतशीर चालू आहेत

## महाराष्ट्र सरकारला रेसिंगपासून २·९६ कोटी रु. प्राप्ती

घोड्यांच्या शर्यतीपासून कर आणि परवाना फी ह्यांच्या रूपाने महाराष्ट्र सरकारला १९६९–७० मध्ये २ कोटी, ९६ लक्ष रु. मिळाले. ह्या शर्यती बंद कराव्यात अशी मागणी असताही सरकार त्या बंद करण्यास तयार नाही, त्याचे कारण ही प्रचंड प्राप्ती.

## अल्पबचतीचे प्रमाण ग्रामीण भागात फार कमी

अल्पबचतीच्या एकूण जमेपैकी फक्त २०% रकम ग्रामीण भागातील असते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत अल्पबचतीच्या रूपाने एकूण २३४ कोटी रु. जमा झाले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ती रकम ४०६ कोटी रु. भरली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ती ५६५ कोटी रु. भरली. चौथ्या पंचवार्षिक योजनेचे लक्ष्य ७७० कोटी रु. चे आहे. ग्रामीण भागातील बचत जमा करण्याची कार्यक्षम यंत्रणाच नाही. शहरी भागातही प्रचाराला अद्याप खूप वाव आहे. २·५ कोटी कामगारांपैकी फक्त २० लक्ष कामगार "पे रोल सेव्हिंग्ज ग्रुप" मध्ये सामील झालेले आहेत.

## जगातील ८० कोटी निरक्षरांपैकी ३५ कोटी भारतीय

भारतातील १५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या एकूण स्त्री-पुरुषांपैकी ७० % पेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. पाकिस्तान, इराण, ह्या देशांतही एवढे लोक निरक्षर आहेत. अफगाणिस्तानात आणि नेपाळमध्ये हे प्रमाण ९०% पेक्षा अधिक आहे. सिलोन, दक्षिण कोरिया, फिलिपाइन्स, बर्मा, थायलँड, तैवान, मलेशिया, ह्या देशांत ते २७% ते ४७% आहे. ह्याचा अर्थ, बुद्धधर्मीय देशात भारत आणि पाकिस्तान ह्या देशांपेक्षा निरक्षर पुष्कळच कमी आहेत. जगातील एकूण ८० कोटी निरक्षरांपैकी ३५ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या दोनतृतीयांश निरक्षर लोक भारतीय आहेत.

## एव्हरेस्ट व्ह्यू हॉटेल

नेपाळमध्ये, ३,९०० मीटर उंचीवर, मौंट एव्हरेस्टच्या वाटेवर आणि त्या शिखराच्या अगदी समीप, एव्हरेस्ट व्ह्यू हे नवे हॉटेल येत्या नाताळात सुरू होईल. नामचे ह्या गावातूनच एव्हरेस्टला जाण्याची वाट आहे; त्या गावापासून दोन दिवसांच्या वाटचालीच्या अंतरावर हे हॉटेल उभारण्यात आले आहे. येथून हिमालयातील कित्येक बर्फाच्छादित शिखरे अगदी जवळून दृष्टीस पडतात. ह्या हॉटेलने वाहतुकीची अडचण सोडविण्यासाठी स्वतःचे विमान ( 'हिमालयन'– ब्रिटिश बनावटीचे ब्रिटन-नॉर्मन BN. 2 A 3 ) घेतले असून हॉटेलजवळ विमान उतरण्यासाठी ६०० मीटर लांबीची पट्टीही तयार केली आहे. इतक्या उंचीवर हवेत ऑक्सिजन पुरेसा असणार नाही, ह्यासाठी हॉटेलमध्ये स्वतःचे ऑक्सिजन क्लिनिक ठेवण्यात येईल.

## फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशन सिनेमा थिएटरे चालविणार

फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशन मुंबई, मद्रास, कलकत्ता आणि दिल्ली ह्या ठिकाणी प्रत्येकी एक सिनेमा थिएटर भाड्याने घेणार आहे. त्यासाठी १९७०–७१ करीता २५ लक्ष रु. बाजूस काढून ठेवण्यात येतील. हा प्रयोग यशस्वी ठरला तर कॉर्पोरेशन स्वतःची सिनेमा थिएटरे बांधण्यास प्रारंभ करील.

## विमानात उद्योगपतींसाठी सेक्रेटरींची नेमणूक

ब्रिटिश युनायटेड एअरवेजने आपल्या विमानात मिनी स्कर्ट घातलेल्या सेक्रटरी उद्योगपतींसाठी नेमण्यास प्रारंभ केला. त्यामुळे उद्योगपतींना विमान प्रवास करतानाही कामे करता येतील.

## "सरकारने पदव्या देणे बंद करावे"

भारतरत्न, पद्मभूषण, पद्मश्री, असली अवार्डस देण्याची पद्धत करण्यास सांगणारे घटनादुरुस्तीचे बिल आचार्य कृपलानी ह्यांनी लोकसभेत मांडले आहे. घटनेने नागरिकांना पदव्या देण्यास सरकारला बंदी केली, परंतु पदव्यांना 'अवार्ड' असे संबोधून सरकार घटनेची तरतूद डावलीत आहे आणि ह्या देण्या-घेण्यास त्यामुळे उत्तेजन मिळत आहे, असे आचार्य कृपलानींचे म्हणणे आहे.

## सरकारी कारखान्यांच्या गलथानपणामुळे विमेदारांचे नुकसान

सरकारी कारखाने, म्युनिसिपॉलिट्या आणि पंचायत समित्या आपल्या नोकरांकडून आयुर्विम्याचे हप्ते जमा करतात, पण ते आयुर्विमा मंडळाकडे पाठविण्याची दक्षता घेत नाहीत, ह्याबद्दल मंडळाचे चेअरमन, श्री. टी. ए. पै ह्यांनी तक्रार केली आहे. अशा रीतीने वसूल करून न पाठविलेल्या हप्त्यांच्या रकमेची बेरीज ४ कोटी रु. होते! सरकारी कारखान्यांना तगादे करूनही उपयोग होत नाही. विमेदारांचे विमे रद्द करणेही श्रेयस्कर होणार नाही, कारण त्या बिचाऱ्यांनी हप्ते भरलेले असतात. नुकत्याच घडलेल्या एका उदाहरणात, एका विमेदाराचे क्लेमचे पैसे देण्याचा प्रश्न आहे. त्याच्या कारखान्याने त्याच्या हप्त्याचे पैसे दरमहा कापून घेतले होते, पण ते आयुर्विमामंडळा-कडे पाठविलेच नव्हते. विमेदाराच्या क्लेमचे पैसे देण्यास नकार देता आला असता, तरी मंडळाने हा कायदेशीर मुद्दा पुढे केला नाही. मंडळाने कारखान्याला ताकीद दिली आणि विमेदाराला क्लेमचे पैसे चुकते केले. म्युनिसिपालिट्या आणि पंचायत समित्या विमेदाराच्या विम्याचे आणि प्राव्हिडंट फंडाचे पैसे कापून घेऊन दुसरीकडेच वापरतात असे आढळून आले आहे. कित्येक शिक्षकांच्या विधवांना पतीच्या विम्याचे पैसे मिळणे कठीण जात आहे. कारण, आयुर्विमामंडळ क्लेमचे पैसे देण्यास साहजिकच नकार देते आणि म्युनिसिपालिट्या त्यांतून निसटू पाहतात.

---

## रेल्वे अपघातांची संख्या उतरली, पण ठार होणाऱ्याची व जखमींची संख्या कायम

भारतीय रेल्वेवरील अपघाताची संख्या कमी होत चालली असली तरी अपघातात मरण पावलेल्यांची आणि जखमी झालेल्यांची संख्या पूर्वीसारखीच राहिली आहे. ११,५०० रेल्वे इंजिने, ३४,००० उतारुवाहू डबे, ४,००,००० मालवाहू डबे, अशांनी परिपूर्ण १०,००० आगगाड्या दररोज ९६,००० किलोमीटर लांबीच्या रुळांवरून प्रवास करतात. एकूण आगगाड्यां-पैकी निम्म्या पॅसेंजर गाड्या असून त्यांतून दररोज ६२,००,००० उतारूंची वाहतूक होते. १९६०–६१ मध्ये ८,८०७ अपघात झाले होते; १९६९–७० मध्ये अपघातांची संख्या ५,०३३ वर उतरली. अपघातात मरण पावलेल्यांची आणि जखमी झालेल्यांची संख्या १९६०–६१ मध्ये ४,२९९ होती, ती १९६१–६२ मध्ये ४,४००, १९६२–६३ मध्ये ४,६६२ अशी वाढत गेली. १९६३–६४ मध्ये ती ४,१०५ वर उतरली; १९६४–६५ मध्ये ती ३,९६८ वर आली. परंतु ती संख्या पुनः वाढत गेली–१९६५–६६ मध्ये ४,६०५ आणि १९६६–६७ मध्ये ४,६४६. १९६८–६९ मध्ये ती ३,९३३ होती.

---


तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी

दूरध्वनी : मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६

# दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक



# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

# छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा



माझ्या
छोटेखानी व्यवसायात
माझे अगदी झकास
चालले आहे. त्यासाठी,
**बँक ऑफ महाराष्ट्र**ने
योग्यवेळी केलेल्या
आर्थिक साहाय्याबद्दल
माझे मनापासून धन्यवाद

सुमारे ३०० हून अधिक रस्ता वाहतूक व्यावसायिकांना बँकेचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.
सुमारे एका कोटीच्या घरात.

तुमच्याही छोट्या मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे
आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.

तपशीलासाठी आजच चौकशी करा.

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

6989

# THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : **659–60, Raviwar Peth, Belgaum**

**Share Capital : Rs. Over 8 Lakhs**
**Reserves : Rs. Over 8½ Lakhs**
**Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs**

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*
**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*

# महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना – १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

**सातारा**

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ५० शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

**खेळते भांडवल : १२ कोटींचे वर**
**ठेवी : ११·७५ कोटींचे वर**

**ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.**
**तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.**
**कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.**

**वि. श्री. दामले**
बी. ए., एम्. कॉम्., एल्एल् बी.,
ए. आय्. आय्. सी. चेअरमन




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)